# घोषणा

## महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा 2017

## उमेदवारांनी त्यांची माहिती विहित नमुन्यामध्ये भरुन देणेबाबत मुदतवाढ.

प्रस्तुत परीक्षेसंदर्भात आयोगातर्फे दि. २५ जानेवारी, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेकडे उमेदवारांचे लक्ष वेधण्यात येत आहे. सदर घोषणेनुसार प्रस्तुत परीक्षेस अर्ज केलेल्या उमेदवारांकडून त्यांच्याशी संबंधित असलेल्या विभागासंदर्भातील आवश्यक ती माहिती प्रपत्र-अ (DTS) व प्रपत्र -ब (MES) मध्ये भरून दि. 1 फेब्रुवारी, 2018 पर्यंत पाठविण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तथापि काही उमेदवारांकडून अद्याप सदर माहिती प्राप्त झालेली नाही. तरी ज्या उमेदवारांनी माहिती अद्याप पाठविलेली नाही अशा उमेदवारांनी सदर माहिती **दि.9 फेब्रुवारी,** 2018 पर्यंत groupcemployee@gmail.com या ई-मेल आयडीवर त्वरित पाठवावी. तसेच ज्या उमेदवारांना उपरोक्त प्रपत्रातील माहिती भरण्यास काही अडचणी येत असल्यास अशा उमेदवारांनी त्यासंदर्भात **दूरध्वनी क्रमांक** 020-26120141 येथे तात्काळ संपर्क साधावा .

**सदर तारखेनंतर उमेदवारांनी पाठविलेली माहिती स्विकारली जाणार नाही व अशा उमेदवारांची प्रस्तुत परीक्षेची उमेदवारी त्यांनी अर्जात माहिती योग्य प्रकारे नमूद केलेली नाही या कारणास्तव रद्द करण्यात येईल, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**प्रस्तुत परीक्षेसंदर्भात ज्या उमेदवारांनी मा. प्रशासकीय न्यायाधिकरणात मूळ अर्ज दाखल केले आहेत, अशा प्रकरणी मा. प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेले आदेश विचारात घेऊन सदर उमेदवारांसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.**

ठिकाण : मुंबई
दिनांक : 3 फेब्रुवारी, 2018

**सु. सं. केसरकर**
**उपसचिव (परीक्षा-2)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**